# पणन संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे

**नवीन मध्यवर्ती इमारत, सेंट्रल बिल्डींग,तिसरा मजला, पुणे-४११ ००१**

पीबीएक्स-०२०-२६१२६६२८/२६४२६७८५/२६११४०६४

Email-dirmktms@gmail.com website-www.mahapanan.maharashtr.gov.in


---

जा.क्र.पणन-१३/फवभा/ कांदाअनुदान/करावयाची उपाययोजना /सुचना/२०१८ दिनांक : २९/१२/ २०१८

५०६४

प्रति,

**१. विभागीय सहनिबधंक सहकारी संस्था, (प्रशासन / लेखापरीक्षण ) - (सर्व).**

**२. जिल्हा उपनिबधंक,सहकारी संस्था (सर्व)**

**३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)**

**विषय :- सन २०१८ - २०१९ या वर्षात राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २००/- अनुदान देण्याबाबत करावयाची उपायोजना**

**सदंर्भ :-** **१) शासनाचे क्र.सपस-२०१८/प्र.क्र.३६७/२४-स,**दिनांक २० डिसेंबर २०१८ चे पत्र.

**२) या कार्यालयाचे पत्र क्र.सम दिनांक २१/१२/२०१**

**३) शासन निर्णय क्र.सपस-२०१८/प्र.क्र.३६७/२४-स,दि.२६ डिसेंबर २०१८**

**४) या कार्यालयाचे पत्र क्र.सम दिनांक २७/१२/२०१८**

उपरोक्त विषयाचे संदर्भिय क्रमांक - ३ चे शासन निर्णयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. त्यानुसार, राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या/ खाजगी बाजार समितीमध्ये ०१ नोव्हेंबर २०१८ ते १५ डिसेंबर २०१८ या कालावधीत कांदा विक्री केलेल्या शेतक-यांना शेतकऱ्यांना प्रती क्विंटल २०० रुपये व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रती शेतकरी या प्रमाणात अनुदान मंजुर करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे. सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी त्यामध्ये अटी व शर्ती निश्चित केलेल्या आहेत. त्याप्रमाणे आपले स्तरावरुन, तात्काळ कार्यवाही करणे अपेक्षित असुन, खालील प्रमाणे सुचना निर्गमित करण्यांत येत आहेत.

१. सदर योजनेस संबधित कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी व्यापक प्रमाणात प्रसिदधी दयावी.

२. कांदा उत्पादक शेतक-यांनी बाजार समितीकडे १५ जानेवारी, २०१९ पुर्वी विहित नमुन्यात अर्ज करावेत.

३. कृषि उत्पन्न् बाजार समितीने अर्जासोबत १. कांदा विक्रीपटटीची मुळ प्रत. २. कांदा पिक पेरा नोंद असलेला ७/१२ उतारा. ३. राष्ट्रियकृत बँक / जिल्हा सहकारी बँक / खाजगी बँक इ. ज्या बँकेत शेतक-यांनी खाते उघडलेले आहे, त्या बँकेच्या पासबुकाची पहिल्या पानाची छायांकित प्रत ( **IFSC CODE व ACCOUNT NUMBER** सह ) जोडावी.

४. कृषि उत्पन्न् बाजार समितीने सर्व शेतक-यांना अर्जाचा नमुना नि:शुल्क पुरवावा.

५. कृषि उत्पन्न् बाजार समित्यांनी पात्र लाभार्थ्यांची यादी **इंग्रजीत, त्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या बँक पासबुकामध्ये नमुद नावाप्रमाणे अचुक तयार करण्याची दक्षता घ्यावी.**

६. बाजार समितीत जस जसे अर्ज प्राप्त होतील, तसे त्या अर्जाची तपासणी, छाननी समितीने तात्काळ करावी.

७. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे जिल्हास्तीय व तालुकास्तरीय समित्या गठीत करण्यात येत आहेत.

**जिल्हास्तरीय समिती.**

१. जिल्हा उपनिबधंक - अध्यक्ष,
२. जिल्हा विशेष लेखापरीक्षक - सदस्य.,
३. सहाय्यक निबधंक (प्रशासन) - सदस्य सचिव.

**तालुकास्तरीय समिती.**

१. तालुका सहाय्य्क निबधंक - अध्यक्ष.,
२. तालुका लेखापरीक्षक - सदस्य.
३. कृषि उत्पन्न बाजार समितीचे सचिव - सदस्य सचिव.

८. सदर योजनेपासुन आपल्या जिल्हयातील पात्र लाभार्थी वंचीत राहणार नाही. याची दक्षता जिल्हा उपनिबधंक यांनी घ्यावी.

९. संबधित कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी, उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्रपणे कांदा अनुदान कक्ष स्थापन करावा.

वरील सुचनाप्रमाणे, संबधित विभगीय सहनिबधंक (प्रशासन / लेखापरीक्षण), जिल्हा उपनिबधंक , जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहाय्यक निबधंक, तालुका लेखापरीक्षक तसेच संबधित बाजार समितीचे सचिव यांनी याबाबतची सविस्तर माहिती अचूक आकडेवारीसह प्रपत्र **अ** व प्रपत्र **ब** मध्ये शासनास सादर करावयाची असल्याने, त्यास प्रथम प्राधान्य दयावे.

सदर योजनेंतर्गत प्राप्त लाभार्थ्यांच्या प्रस्तावाची छाननी तालुकास्तरीय समितीने प्राधान्याने करुन, सदरचे प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीकडे मंजुरीसाठी सादर करावेत. जिल्हास्तरीय समितीने सदरील प्रस्तावाची छाननी करुन, त्यास अंतिमत: मंजुरी दिल्यानंतर, **जिल्हा उपनिबधंक यांनी पात्र लाभार्थ्यांची संख्या, त्यांची आवक व होणारी रक्कम, याबाबत स्वतंत्रपणे मंजुरीचे आदेश निर्गमित करावेत.**

जिल्हा उपनिबधंक यांनी पात्र लाभार्थ्यांचे आदेश निर्गमित केल्यानंतर, मंजुर आदेशासह, प्रपत्र अ व ब मधील एकत्रित माहिती विनाविलंब **दिनांक २१ जानेवारी, २०१९ पूर्वी** या कार्यालयास (फॉन्ट DVOT –SurekhMR) सॉफट व हार्डकॉपी मध्ये सादर करावी.

Tawaree

**(दिपक तावरे)**
**भा.प्र.से**
**पणन संचालक**
**महाराष्ट्र राज्य पुणे**

**सोबत** - शासन निर्णय, अर्जाचा नमुना, इंग्रजी मधील तक्ता.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

१. मा. प्रधान सचिव, (पणन) सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. सहकार आयुक्त व निबधंक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**सन २०१८-२०१९ या वर्षात राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २००/- अनुदान देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय, क्रमांक: सपस-२०१८/प्र.क्र.३६७/२४ स**

मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२

दिनांक: २६ डिसेंबर, २०१८

**संदर्भ**:- १) मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर,२०१८ रोजीचा मंत्रिमंडळ निर्णय

२) गुरुवार, दिनांक २० डिसेंबर,२०१८ रोजीचा मंत्रिमंडळ निर्णय

**प्रस्तावना**:-

चालू वर्षी राज्यातील अपुऱ्या पावसामुळे कांद्याच्या उत्पादनावर परिणाम झालेला आहे. तसेच कर्नाटक, गुजरात व राजस्थान इत्यादी शेजारील राज्यामध्ये कांद्याचे उत्पादन चांगले झाले असल्याने, उत्तर व दक्षिण भारतातून नियमितपणे असणाऱ्या कांद्याच्या मागणीमध्ये घट झालेली आहे. परिणामी बाजारात कांद्याचा अपेक्षित प्रमाणात उठाव होत नाही. माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये राज्यातील कांद्याची आवक असलेल्या प्रमुख बाजार समित्यांमध्ये कांद्याचे भाव अचानक कमी होऊन शेतकऱ्यांना त्यांचा कांदा अत्यल्प दरात विकावा लागला आहे. याबाबत वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी व सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात बातम्या प्रसिद्ध होऊन राष्ट्रीय स्तरावर कांद्यांच्या घसरलेल्या भावामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याची मागणी निर्माण झाली होती. त्याचप्रमाणे शेतकरी, शेतकरी संघटना, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडूनदेखील कांदा उत्पादकाना दिलासा देण्याची मागणी पुढे येत होती. यासंदर्भात मंगळवार, दिनांक ११.१२.२०१८ च्या मंत्रीमंडळ बैठकीत चर्चा होऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

माहे नोव्हेंबर,२०१८ पासून खरीप व रब्बी हंगामातील कांद्याची राज्यातील प्रमुख बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आवक होत होती. या कालावधीत सर्वसाधारणपणे कांद्यासाठी रुपये २५० ते रुपये ९०० प्रति क्विंटल प्रमाणे अत्यल्प बाजार भाव मिळत होते. मागील वर्षी या कालावधीत कांद्याचे दर रुपये २६००- रुपये २७०० प्रति क्विंटल इतके होते. तसेच, शेतकऱ्यांना कांद्याचे उत्पादन घेण्यासाठी येणारा प्रति क्विंटल खर्च विचारात घेता, राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने दिनांक १ नोव्हेंबर २०१८ ते दिनांक १५ डिसेंबर, २०१८ या कालावधीत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.